ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

ग्रामीण कृ ष मौसम सेवा, ऐएमएफयु,

कृषी हवामानशास्त्र वभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महा वद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला स मतीची साप्ताहिक बैठक दि. २३/०४/२०२४

जिल्हा :पुणे

मागील आठवडयाचे हवामान :

मागील आठवडयाचे हवामान : पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३७.८ ते ४०.६ अंश सेल्सिअस तर कमान तापमान २१.१ ते २४.९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ५९ ते ८३ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता २१ ते २७ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २.७ ते ४.५ क.मी. होता.

हवामान अंदाज : पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ४० ते ४१ अंश सेल्सिअस, तर कमान तापमान २१ ते २३ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ५१ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता २४ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ११ ते १५ क.मी. दरम्यान राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा नैऋत्तेकडून ईशान्येकडे राहील.

मागील आठवड्यातील हवामान (१७०४/२०२३ ते २३/०४/२०२४)							हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२३/०४/२०२४ ते २७/०४/२०२४)				
17	**18**	**19**	**20**	**21**	**22**	**23**	दिनांक	**24**	**25**	**26**	**27**	**28**
5.0	4.2	0.0	0.0	2.2	0.0	0.0	पाऊस (ममी)	4	10	4	2	3
40.2	39.7	40.6	39.4	39.0	37.8	39.0	कमाल तापमान(अं.से.)	40	40	40	41	41
24.5	24.3	24.9	24.1	21.1	21.5	22.0	कमान तापमान(अं.से.)	21	22	21	22	23
							ढग स्थिती (आकाश)	2	2	3	2	3
80	83	76	65	78	59	61	सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	47	55	48	52	52
27	21	22	26	27	23		दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	25	24	24	25	24
2.9	4.2	4.5	4.5	3.6	2.7	3.5	वाऱ्याचा वेग (कमी/तास)	11	11	13	14	15
							वाऱ्याची दिशा (अंश)	297	105	112	288	198

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	पीक अवस्था	कृ ष वषयक सल्ला
हवामान सारांश/ इशारा		भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २३ ते २७ ए प्रल, २०२४ दरम्यान तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २४ ए प्रल, २०२४ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० क.मी./तास), मेघगर्जना, वजांसह पावसाची शक्यता आहे.
वस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस)		वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २८ ए प्रल, २०२४ ते ०४ मे, २०२४ दरम्यान ➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. ➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. ➢ कमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.

सामान्य सल्ला		• तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेली पकांची काढणी करुन घ्यावी. काढणी झालेल्या पकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी. मळणी करणे शक्य नसल्यास, काढलेली पके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या ताडपत्रीने झाकून ठेवावीत. • तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने उभ्या पकात पावसाचे पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी व निचऱ्याची व्यवस्था करावी. • अवेळी पाऊसापासून बचावासाठी उघडयावरील धान्य सुर क्षत स्थळी हलवावे. • पावसाचा अंदाज बघून पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी. • जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत. • उभ्या पकांना व फळ बागांना आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार पाणीपुरवठा करावा. • शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात. • शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. • तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व वजेचा पूर्वानुमाना करीता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा.
उन्हाळी भुईमुग	शेंगा पोसण्याची अवस्था	पकास आवश्यकतेनुसार, उपलब्धतेनुसार व ज मनीच्या मगदुराप्रमाणे पाणीपुरवठा करावा. रस शोषक कडींच्या नियंत्रणासाठी म थल डीमेटॉन २५ ईसी १० मली प्रति १० लटर पाण्यात मसळून फवारणी करावी. ढगाळ हवामानामुळे टिक्का रोग नियंत्रणासाठी मॅंकोझेब २.५ ग्रॅम कंवा कार्बेन्डा झम १ ग्रॅम प्रति लटर पाण्यातून फवारावे.
कांदा	काढणी अवस्था	तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने पक्व पकांची काढणी लवकर उरकून घ्यावी तसेच कांदा काढताना पतीसह काढून तो ३ ते ४ दिवस सुकू द्यावा. काढलेला कांदा ओळीमध्ये रचावा व अर्धवटरित्या पातीने झाकावा . पात वळल्यानंतर ४ से.मी. लांब मान ठेऊन पात कापावी. पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या ताडपत्रीने झाकून ठेवावीत.
केळी	पीक वाढीची अवस्था	पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गर्जेप्रमाणे बांबूच्या कंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सहयायाने झाडांना/घडाना आधार/टेकू द्यावा. मावा कडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट २० मली प्रती १० लीटर पाण्यात मसळून फवारणी करावी. केळी बागेत काकडी, भोपळा, क लंगड, खरबूज तसेच मरची, वांगी यासारखी पके घेणे कटाक्षाने टाळावे.
द्राक्ष	ए प्रल / खरड छाटणी	छाटणी वेळेवर करून छाटलेल्या काड्या व पाने बांधावर न टाकता योग्य रित्या नष्ट करावे.
जनावरांचे व्यवस्थापन		तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत. सर्व जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पण्यास स्वछ पाणी द्यावे. उसाचे वाढे जनावरांना जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. खाऊ घालावयाचे असल्यास प्रति दिन एका जनावरास केवळ ८ कलो वाढे आ ण त्यासोबत सकस द् वदल वर्गातील हिरवा चारा, गरजेनुसार वाळलेला चारा व आंबवण तसेच २५ ते ३० ग्रम क्षार मश्रण देणे अत्यंत गरजेचे आहे.
*टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/काळजी घ्यावी.		

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादे शक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म. व., पुणे.

दि. : २३.०४.२०२४

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा

प्रमुख, कृ ष हवामानशास्त्र वभाग, कृ.म. व., पुणे